2020-2021

# महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग



## २० वा वार्षिक अहवाल

१ एप्रिल २०२० - ३१ मार्च २०२१

# महाराष्ट्र राज्य

# मानवी हक्क आयोग

# २० वा वार्षिक अहवाल

# १ एप्रिल २०२० ते ३१ मार्च २०२१

## वार्षिक अहवाल – वर्ष २०२०-२१

उपोद्‌घात

**" स्वातंत्र्य म्हणजे सर्वत्र मानवी हक्क सर्वत्र सर्वोच्च असणे.  हे हक्क प्राप्त करण्यासाठी व सांभाळून ठेवण्यासाठी जे झगडतात त्यांना आमचा पाठिंबा आहे.  प्रयोजनांची एकता हे आमचे सामर्थ्य आहे.  या उच्च संकल्पनेसाठी विजयाखेरीज अन्य अंत नाही. "**

**– फ्रँकलीन डेलॅनो रुसवेल्ट**

दि. ०१.०४.२०२० ते दि. ३१.०३.२०२१ या वर्षाचा २० वा वार्षिक अहवाल सादर करताना आयोगाला आनंद होत आहे.

मानवी हक्क म्हणजे सर्व मानवांचे अनन्य संक्राम्य असलेले मूलभूत हक्क.  मानवी हक्क हे देश, स्थान, भाषा, धर्म, मानववंशीय उद्‌गम, लिंग, जात, जमात इत्यादींच्या पलीकडे सार्वत्रिक अशा स्वरूपाचे आहेत. राष्ट्रसंघाच्या (यूनो) परिषदांनुसार व संकेतांनुसार व मानवी हक्काच्या सार्वत्रिक घोषणांमध्ये भर दिल्यानुसार कोणत्याही देशामध्ये कोणतीही राजकीय, आर्थिक किंवा सांस्कृतिक पद्धती अंमलात असली तरीही सर्व मानवी हक्कांचे संरक्षण करणे हे व त्यांना प्रोत्साहन देणे त्या-त्या राज्याचे कर्तव्य आहे. त्यानुसार भारतामध्ये मानवी हक्क संरक्षण अधिनियम, १९९३ अस्तित्वात आला.

या अधिनियमाचे उद्दिष्ट सीमित असले, म्हणजेच मानवी हक्क आयोग हा केवळ सार्वजनिक सेवकांनी केलेल्या मानवी हक्कांच्या उल्लंघनाचीच चौकशी करू शकतो आणि केवळ शिफारस करणारे आदेशच जारी करू शकतो तरीही महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाने त्यांचे मर्यादित अधिकार व मर्यादित अधिकार क्षेत्र यामध्येही आयोगाला प्राप्त झालेल्या मानवी हक्क अधिकारांच्या उल्लंघनाच्या तक्रारींची चौकशी करणे व स्वतःहून पुढाकार घेऊन चौकशी करणे याद्वारे सार्वजनिक सेवकांनी केलेल्या मानवी हक्काच्या उल्लंघनामध्ये लक्ष घातले आहे.  महाराष्ट्र राज्यामध्ये जागरुकता आणण्यासाठी महाराष्ट्र राज्याने केलेल्या प्रयत्नांचे फळ म्हणून मोठ्या संख्येने तक्रारी प्राप्त झाल्या व त्यांची चौकशी करण्यात आली. आयोगाला मिळणारे अनुदान व पायाभूत सुविधा मर्यादित असल्या, तरीही आयोग मानवी हक्कांच्या उल्लंघनाबाबतची गाऱ्हाणी व तक्रारी याकडे लक्ष देत आहे.  महाराष्ट्र राज्यात मानवी हक्कांच्या स्थितीमध्ये सुधारणा करणे व सर्व समाजाच्या कल्याणासाठी मानवी हक्कांच्या संरक्षणाचे संवर्धन करणाऱ्या संस्कृतीला प्रोत्साहन देणे यासाठी महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग प्रयत्न करीत आहे. या अहवालामध्ये आयोगाच्या या प्रयत्नांचे प्रतिबिंब दिसते.

M. A. Sayeed

**एम. ए. सईद,**
प्रभारी अध्यक्ष/सदस्य

**तुकाराम  मुंढे,**
सचिव

## अनुक्रमणिका



| अनुक्रमांक | उपोद्घात | पृष्ठक्रमांक |
|---|---|---|
| १ | परिचय | १ ते ४ |
| २ | आयोगाने हाताळलेल्या तक्रारी | ५ ते ८ |
| ३ | मा. अध्यक्ष व सदस्य तसेच अन्वेषण विभाग यांच्या भेटी आणि व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे घेण्यात येणारी खटल्यांची सुनावणी | ९ ते १० |
| ४ | स्त्रोत | ११ |
| ५ | उदाहरणादाखल खटले | १२ ते १८ |
| ६ | आयोगाने केलेल्या शिफारशींची शासनाने केलेली पूर्तता आणि अव्हेर | १८ |

# विभाग १ – परिचय

मानवी हक्क म्हणजे मानवी वर्तणुकीच्या दर्जाची विवरण करणारी काही नैतिक तत्त्वे किंवा रिवाज होय. सदर मानवी हक्कांचे आंतरराष्ट्रीय कायद्यामध्ये नियमितपणे संरक्षण होते. सर्वसाधारणपणे जे मानवी हक्क म्हणजे असे मूलभूत हक्क की जे मानवाला तो केवळ मानव आहे म्हणून त्याच्या जन्मापासून प्राप्त असलेले असे स्वाभाविक हक्क की जे अनन्य संक्राम्य आहेत व जे देश, स्थान, भाषा, धर्म, मानववंशीय उद्‌गम, लिंग, जात, जमात किंवा अन्य स्थिती यांच्या पलीकडे आहेत. ते हक्क सर्वत्र लागू पडतात व सार्वत्रिक आहेत आणि प्रत्येक व्यक्तीला सारखेच आहेत या अर्थाने ते हक्क समतावादी आहेत. त्यांच्यासाठी समरसतेची आवश्यकता असते. तसेच कायद्याच्या नियमांची आवश्यकता असते व त्याद्वारे एखाद्या व्यक्तीने अन्य व्यक्तींच्या मानवी हक्कांचा सन्मान करावा असे त्या व्यक्तीवर बंधन येते.

मानवी इतिहासामध्ये हक्क व स्वातंत्र्याच्या कल्पना कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपामध्ये अस्तित्वात असल्या तरीही मानवी हक्कांच्या पूर्वीच्या कल्पना या मानवी हक्कांच्या आधुनिक कल्पनांशी फारशा जुळत नव्हत्या. मानवी हक्कांच्या आधुनिक कल्पना यांचा उगम आपल्याला युरोपमधील पुनरुज्जीवन व प्रोटेस्टंटांच्या सुधारणा यातून शोधता येईल. तसेच मध्ययुगामध्ये प्रभावशाली असलेल्या सरंजामशाही पद्धती व धार्मिक रुढीप्रियता यांचा अस्त होणे यातूनही मानवी हक्कांच्या आधुनिक कल्पनांचा उगम शोधता येईल.

रेडक्रॉसच्या आंतरराष्ट्रीय समितीचे संस्थापक श्री. हेन्री डुआंट यांच्या प्रयत्नांमुळे १८६४ व १९४९ यांच्यामध्ये जिनेव्हा संकेत अस्तित्वात आले. हे संकेत सशस्त्र संघर्षामध्ये गुंतलेल्या व्यक्तींच्या मानवी हक्कांचे संरक्षण करतात व ते १८९९ व १९०७ च्या हेग संकेतावर आधारित आहेत. धर्मनिरपेक्ष आंतरराष्ट्रीय कायद्याच्या उपजत स्वरूपामध्ये युद्ध व युद्धविषयक गुन्हे याबाबतच्या कायद्यांना औपचारिक स्वरूप देण्याचा हा आंतरराष्ट्रीय समाजाचा पहिला प्रयत्न होता. दुसऱ्या महायुद्धामुळे या संकेतामध्ये सुधारणा झाली व ते संकेत आंतरराष्ट्रीय समाजाने १९४९ मध्ये पुन्हा स्वीकारले.

दुसऱ्या महायुद्धानंतरच्या विश्वामध्ये मानवी हक्कांचे सामाजिक व कायदेशीर पद्धतीने संरक्षण होणे हे मूलभूत स्वातंत्र्य असावे याची काळजी वाढू लागली. संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना व संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदीच्या तरतुदी या मानवी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय कायदा व पद्धतीसाठी एक सर्वसमावेशक व्यवस्थेचा / यंत्रणेचा पाया ठरला.

मानवी हक्क सार्वत्रिक असणे, ते हक्क सर्व जगभरात समान असणे हा आंतरराष्ट्रीय मानवी हक्क कायद्यांचा पायाभूत मानक ठरला. १९४८ साली मानवी हक्कांच्या सार्वत्रिक घोषणांमध्ये या तत्त्वावर पहिल्यांदा भर देण्यात आला व अनेक आंतरराष्ट्रीय मानवी हक्क संमेलने, ठराव व घोषणांमध्ये या तत्त्वांचा पुनरुच्चार करण्यात आला आहे. उदाहरणार्थ १९४३ च्या व्हिएन्ना आंतरराष्ट्रीय संमेलनामध्ये असे नोंदले गेले की देशांची राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक प्रणाली किंवा यंत्रणा कोणतीही असली तरी सर्व मानवी हक्क व मूलभूत स्वातंत्र्याला प्रोत्साहन देणे व त्यांचे संरक्षण करणे हे देशांचे कर्तव्य आहे.

मानवी हक्कांबाबतची सार्वत्रिक घोषणा यांच्या कलम १ मध्ये असे म्हटले आहे " सर्व मानव स्वतंत्ररीत्या जन्माला आले आहेत व ते सन्मान/प्रतिष्ठा व हक्क याबाबत समान आहेत. त्यांना समजूतदारपणा व सदसद्‌विवेकबुद्धी लाभली आहे व त्यांनी बंधुत्वाच्या भावनेने एकमेकांबरोबर वागावे." भारताच्या घटनेमध्ये सुद्धा मानवी हक्कांच्या सर्व सार्वत्रिक घोषणेचा मूलभूत हक्क म्हणून समावेश केला आहे. भारताच्या संसदेने १९४३ मध्ये मानवी हक्क संरक्षण अधिनियम, १९९३ पारित केला. हा अधिनियम मानवी हक्कांच्या उल्लंघनाविरुद्ध सुरक्षितता प्रदान करतो. या अधिनियमामध्ये राष्ट्रीय मानवी हक्क आयोग व राज्य मानवी हक्क आयोगाची स्थापना करण्याचा तसेच जिल्हा स्तरावर मानवी हक्क न्यायालय स्थापन करण्याची तरतूद आहे. आंतरराष्ट्रीय संकेत व मानवी हक्क संरक्षण अधिनियम, १९९३ यांच्यानुसार महाराष्ट्र राज्यामध्ये मानवी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाची स्थापना दि. ६ मार्च, २००१ रोजी झाली.

## आयोगाची रचना

महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग ही वैधानिक संस्था आहे. त्याची रचना खालीलप्रमाणे—

- जी व्यक्ती एखाद्या उच्च न्यायालयाची मुख्य न्यायाधीश किंवा न्यायाधीश होती अशी व्यक्ती आयोगाची अध्यक्ष असेल.
- अशी व्यक्ती की जी उच्च न्यायालयाची न्यायाधीश होती किंवा आहे किंवा राज्यातील जिल्हा न्यायालयामध्ये न्यायाधीश होती किंवा आहे आणि त्या व्यक्तीला जिल्हा न्यायाधीश म्हणून किमान सात वर्षे अनुभव आहे, अशी व्यक्ती आयोगाची सदस्य असेल.
- अशा व्यक्तीला आयोगाचा सदस्य नेमला जाईल की ज्या व्यक्तीला मानवी हक्कासंबंधित बाबींच्या संबंधित अनुभव असेल किंवा मानवी हक्कासंबंधित बाबींचे ज्ञान असेल.

**आयोगाचे कार्य**

शासकीय सेवकाकडून मानवी हक्कांचा भंग होत आहे का यावर लक्ष ठेवणे व त्याबाबत चौकशी करणे हे मानवी हक्क आयोगाचे मुख्य कार्य आहे.

अधिनियमाच्या कलम १२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे खाली नमूद केलेली सर्व कार्य आयोग करते :–

(अ) पीडिताने किंवा त्याच्या वतीने अन्य कोणीही सादर केलेल्या तक्रारीवरून आयोग स्वतःहून किंवा न्यायालयाच्या आदेशावरून आयोग खालील बाबतीत कृती करु शकतो :–

- मानवी हक्कांचे उल्लंघन किंवा असे उल्लंघन होण्यासाठी प्रोत्साहन दिले गेले आहे;
- मानवी हक्कांचे असे उल्लंघन होऊ नये यासाठी प्रतिबंधात्मक उपाय योजण्यात हलगर्जीपणा होणे;

(ब) मानवी हक्कांचे उल्लंघन होत आहे / झाले आहे असे आरोप असलेल्या न्यायालयासमोर असलेल्या कोणत्याही खटल्यामध्ये न्यायालयाच्या अनुमतीने मध्यस्थी करणे;

(क) त्यावेळी अंमलात असलेल्या कायद्यामध्ये काहीही तरतूद असली तरीही राज्य शासनाच्या नियंत्रणाखाली असलेल्या कोणत्याही संस्थेला, तुरुंगाला भेट देणे की जेथे माणसांना उपचारासाठी, सुधारण्यासाठी किंवा संरक्षणासाठी स्थानबद्ध केले आहे. सदर स्थानांमध्ये असलेल्या व्यक्तींसाठीच्या रहाण्याच्या परिस्थितीचा अभ्यास करणे व त्याबाबत शिफारसी करणे यासाठी या भेटी दिल्या जातील;

(ड) मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी घटनेमध्ये किंवा अन्य कोणत्याही कायद्यामध्ये कोणते सुरक्षा उपाय योजले आहेत याचा आढावा घेणे व त्याच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी उपाययोजना सुचवणे;

(इ) मानवी हक्कांचा उपभोग घेण्यात अडथळे आणणाऱ्या कोणत्याही घटकांचा, की ज्यात दहशतवादाचा समावेश आहे, आढावा घेणे व त्यावर उपाययोजना सुचवणे;

(फ) मानवी हक्कांबाबत करार व अन्य आंतरराष्ट्रीय कागदपत्रे, उपाययोजना यांचा अभ्यास करणे व त्यांची परिणामकारक अंमलबजावणी होण्यासाठी शिफारसी करणे;

(ग) "मानवी हक्क" या क्षेत्रामध्ये संशोधन करणे व अशा संशोधनाला प्रोत्साहन देणे;

(ह) समाजाच्या अनेक भागांमध्ये मानवी हक्क साक्षरतेचा प्रसार करणे व अशा हक्कांच्या रक्षणासाठी उपलब्ध असलेल्या सुरक्षा उपायांची विविध माध्यमांकडून प्रसिद्धी, संमेलने व अन्य साधनांमधून करणे;

(आय) "मानवी हक्क" या क्षेत्रात कार्य करणाऱ्या अशासकीय संघटनांच्या व अन्य संघटनांच्या प्रयत्नांना प्रोत्साहन देणे;

(ज) मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी आवश्यक असणारी अन्य कोणतीही कार्ये.

**आयोगाकडे तक्रार करतानाची कार्यपद्धती किंवा आयोग स्वतःहून कृती करील तेव्हाची कार्यपद्धती**

१. मानवी हक्कांचा भंग झाल्याची तक्रारी पीडित व्यक्ती किंवा त्या व्यक्तीतर्फे अन्य व्यक्ती तक्रार दाखल करू शकेल. सदर तक्रार मराठी, हिंदी किंवा इंग्रजी भाषेत करता येईल. सदर तक्रार ऑनलाईन किंवा टपालाने सादर करता येईल.

२. तक्रार करताना कोणतेही शुल्क द्यावे लागणार नाही, कोणतेही कोर्ट फी तिकीट लावावे लागणार नाही. वकील नेमण्याची गरज नाही.

३. कोणत्याही शासकीय सेवकांविरुद्ध तक्रार करायची असेल तर ती आयोगाच्या अध्यक्षांना उद्देशून करायची असते व त्यामध्ये खालील तपशील असणे आवश्यक आहे :–

- तक्रारदाराचे पूर्ण नाव
- तक्रारदाराचा पूर्ण टपालाचा पत्ता
- टेलिफोन क्रमांक / ई-मेल क्रमांक
- घटनेची तारीख व स्थळ
- घटना केव्हा घडली ती वेळ

- मानवी हक्कांच्या उल्लंघनाच्या घटनांचा तपशील स्पष्ट करा.
- कोणत्या शासकीय सेवकाविरुद्ध / शासकीय विभागाविरुद्ध / शासकीय संस्थेविरुद्ध / शासकीय प्राधिकरणाविरुद्ध तक्रार केली जात आहे?
- सदर बाब कोणत्याही न्यायालयात, राष्ट्रीय मानव हक्क आयोगात, न्यायासनात किंवा अन्य वैधानिक मंचाकडे प्रलंबित आहे काय?
- ज्या अनुतोषाची मागणी केली आहे तो अनुतोष.

(शा.म.मु.) वाय ४६३—३ (१०-७-२०२२)

**आयोगाकडे येण्याचे फायदे**


| | | |
|---|---|---|
| संस्थात्मक स्वायत्तता व स्वातंत्र्य | सोपी उपलब्धता | कोणतेही शुल्क आकारले जात नाही |
| कमी किचकट कार्यपद्धती | त्वरित न्याय | कोणत्याही व्यावसायिक वकिलाच्या सहाय्याची आवश्यकता नाही |

## भाग २ – विभाग आयोगाने हाताळलेल्या तक्रारी


दि. १ जानेवारी, २०२० ते दि. ३१ डिसेंबर, २०२० या काळामध्ये आयोगाला एकूण ३,७६३ तक्रारी प्राप्त झाल्या. खालील तक्त्यामध्ये नव्याने प्राप्त झालेल्या तक्रारी, प्रलंबित तक्रारी व निकालात काढलेल्या तक्रारी यांचा तपशील दिला आहे.

**दि. १ जानेवारी, २०२० ते दि. ३१ डिसेंबर, २०२० या काळातील खटल्यांचा सांख्यिकी तक्ता**

| आधी प्रलंबित असलेले खटले / प्रारंभीची शिल्लक | नव्याने प्राप्त झालेल्या तक्रारी | सदर कालखंडातील एकूण तक्रारी | वर्षात एकूण निकालात काढलेल्या तक्रारी | परिहार केलेल्या एकूण बाबी / शिफारसी | सदर काळाच्या शेवटी प्रलंबित खटले |
|---|---|---|---|---|---|
| १८०५७ | ३७६३ | २१८२० | १०८३ | १५ | २०७३७ |




**परिहार केलेल्या एकूण बाबी - १५**




**प्रलंबित तक्रारींचे स्वरूप**

पोलीस बलांविरुद्ध – या तक्रारींमध्ये जास्त करून पुढील तक्रारी होत्या. पोलीस बलाविरुद्ध अधिकाराचा व सामर्थ्याचा गैरवापर, गुन्हा नोंदवून न घेणे, बेकायदेशीररीत्या स्थानबद्ध करणे / अटकाव करणे – १,५५८ तक्रारी

तुरुंगातील कैद्यांच्या मानवी हक्कांचे उल्लंघन झालेल्या तक्रारी – १३२ तक्रारी


न्यायसंस्थेविरुद्धच्या तक्रारी – ११

बँकांविरुद्ध तक्रारी – ०

सेवाविषयक बाबींच्या तक्रारी – ३३२

अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती व अन्य अल्पसंख्याकांवरील अत्याचाराविरुद्धच्या तक्रारी – १२

अन्य संकीर्ण तक्रारी - १,७१८




**तक्रारींचे स्वरूप**


* शासकीय विभागांमध्ये शेती, वनविभाग, आरोग्य विभाग, आदिवासी विभाग, पर्यावरण विभाग, अन्य विभाग, महसूल विभाग इत्यादींचा समावेश होतो.

* संकीर्णमध्ये शासनाच्या संस्था, बँक, महामंडळे, कौटुंबिक वादविवाद वसूली करणारे एजंट, कर्जे इत्यादींचा समावेश होतो.

एकूण तक्रारी – ३,७६३

जानेवारी, २०१९ ते डिसेंबर, २०१९ या काळातील न्यायालय क्र.१, २ व ३ मध्ये निकालात निघालेल्या खटल्यांचा तपशील

| कालखंड | प्राथमिक स्तरावरील खटले (लिमिने) | १७(१)(ब) | सुनावणीनंतर | शिफारसी | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| जानेवारी, २०२० ते डिसेंबर, २०२० | ५८४ | ० | ४७८ | १५ | १०७५ |



## विभाग ३ – आयोगाचे माननीय अध्यक्ष व माननीय सदस्य किंवा अन्वेषण चमू (टीम) यांनी दिलेल्या भेटी आणि व्हीडीओव्दारा संमेलन या पद्धतीने घेतलेल्या सुनावण्या

आयोगाच्या माननीय सदस्यांनी दि.१ जानेवारी, २०२० ते दि.३१ मार्च, २०२१ या काळात तुरुंग/ पोलीस ठाणी/आंतरवासी कार्यक्रम/ वेबिनार येथे दिलेल्या भेटी, व्हीडीओ संमेलन पद्धतीने उपस्थित राहिलेली संमेलने, परिषदा, सुनावण्या व अन्य महत्त्वाच्या कार्यक्रमांचा तपशील

| अ.क्र. | कार्यक्रमाचा दिनांक | कार्यक्रमाची जागा | प्रयोजन |
|---|---|---|---|
| १. | २६.१०.२०२० | आभासी संमेलनामार्फत | मानवी हक्काचे विविध पैलू या विषयावर रोटरी क्लब, नागपूर फोर्ट यांनी आयोजित केलेले वेबीनार |
| २. | ०६.११.२०२० | आभासी संमेलनामार्फत | राष्ट्रीय वेबीनार – International Justice Mission आणि महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग यांच्या संयुक्त विद्यमाने “मानवी देह व्यापार, हितसंबंधितांचा (स्टेक होल्डर्सच्या) प्रतिसाद” या विषयावर आयोजित राष्ट्रीय वेबीनार |
| ३. | १०.१२.२०२० | आभासी संमेलनामार्फत | ए.के.खान लॉ अकॅडमी अँड पी.एच.डी. (लॉ) रिसर्च सेंटर, पुणे यांनी आयोजित केलेला “भारतामध्ये मानवी हक्कांच्या रक्षणामध्ये मानवी हक्कांची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांची भूमिका” या विषयावरील वेबीनार |
| ४. | १०.१२.२०२० | आभासी संमेलनामार्फत | आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिन साजरा केला – “चांगल्या पद्धतीने बरे व्हा,- मानवी हक्कांसाठी उभे ठाका” या विषयावरील वेबीनार. |
| ५. | १०.०२.२०२१ | आभासी संमेलनामार्फत | टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस यांनी आयोजित केलेला “न्याय व उत्तम प्रशासन हे प्राप्त होण्यासाठी मानवी हक्क संस्था व हक्कांवर आधारित कायदे व्यवस्था हे साधन आहे” या विषयावर वेबीनार |
| ६. | १२.०२.२०२१ | आभासी संमेलनामार्फत | “HURT” प्रतिष्ठान ने आयोजित केलेला “मानवी हक्कांची अंमलबजावणी करण्यात आयोगाची भूमिका” या विषयावर वेबीनार |
| ७. | १८.०२.२०२१ | आभासी संमेलनामार्फत | राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाने आयोजित केलेला अल्पकालीन आंतरनिवासी कार्यक्रम – आंतरवासियांना संबोधणे व त्यांच्याबरोबर संवाद साधणे |

| दि.१ जानेवारी, २०२० ते दि.३१ मार्च, २०२१ या कालावधीत व्हीडीओ कॉन्फरसिंगद्वारे घेतलेल्या सुनावण्यांचा तपशील | | |
|---|---|---|
| अ.क्र. | केस नंबर | तुरुंगाबाहेर व्हीडीओ कॉन्फरसिंगद्वारे सुनावणी |
| १. | १३६१/१३/२३/२०२० | येरवाडा मध्यवर्ती तुरुंग, पुणे |
| २. | ७२२/१३/१७/२०२०/c/w ५९६२/२०१८ | नागपूर मध्यवर्ती तुरुंग, नागपूर |
| ३. | ३०३१/१३/२०/२०२० | अधिक्षक, तळोजा मध्यवर्ती तुरुंग, नवी मुंबई |

### जानेवारी, २०२० ते मार्च, २०२१ या काळात अन्वेषण विभागाने दिलेल्या भेटी

| दि.१ जानेवारी, २०२० ते दि.३१ मार्च, २०२१ या कालावधीत व्हीडीओ कॉन्फरसिंगद्वारे घेतलेल्या सुनावण्यांचा तपशील | | |
|---|---|---|
| अ.क्र. | दिनांक | भेटीचा तपशील |
| १. | २५.११.२०२० | तळोजा मध्यवर्ती तुरुंग, नवी मुंबई येथे केस नं.३१६६/१३/२०/२०२० |
| २. | १२.०२.२०२१ | गोराई पोलीस स्टेशन, मुंबई येथे केस नं.१३९७/१३/१६/२०१९ |
| ३. | ०५.०१.२०२१ | तळोजा मध्यवर्ती तुरुंग, नवी मुंबई येथे केस नं.३०३१/१३/२०/२०२० आणि केस नं.२७३६/१३/२०/२०१९ |

**अंतर्वासी कार्यक्रम, प्रशिक्षण व संस्थांना भेटी**

कोविड-१९ महामारीमुळे अंतर्वासी कार्यक्रम, प्रशिक्षण व संस्थांना भेटी करता आल्या नाहीत.

**अंतर्वासी कार्यक्रम, प्रशिक्षण व संस्थांना भेटी**


**माननीय राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते कोविड योद्ध्यांचा सन्मान दि.०८.१२.२०२०**

आयोगाचे प्रभारी अध्यक्ष/सदस्य माननीय एम.ए.सईद यांचा महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल यांनी दि.०८.१२.२०२० रोजी भारती विकास संस्थेने राजभवन येथे झालेल्या समारंभात कोविड योद्धा म्हणून सन्मान केला.

## विभाग ४ – स्त्रोत

शासनाकडून वित्तीय वर्ष २०२०-२१ साठी प्राप्त झालेला निधी

| | रुपये हजारात |
|---|---|
| वेतनासाठी अनुदान | २९,००० |
| वेतनेतर अनुदान | ७,५०० |
| **एकूण** | **३६,५००** |



## विभाग ५ –

## उदाहरणात्मक खटले

| | |
|---|---|
| १. खटला क्रमांक : | २०७/१३/१६/२०१९ |
| तक्रारदाराचे नाव : | नारायण मेहेरा |
| प्रतिवादीचे नाव : | प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मुंबई<br>महानगरपालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगर पालिका<br>मुख्य वनरक्षक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, मुंबई<br>मुख्य कार्यकारी अभियंता, म्हाडा, मुंबई |
| आदेशाचा दिनांक : | ३ सप्टेंबर, २०२० |
| गणपूर्ती (कोरम) : | एम.ए.सईद, प्रभारी अध्यक्ष / सदस्य |

**तक्रारीचे स्वरुप :**

दहिसर या मुंबईच्या पश्चिम उपनगरातील केतकीपाडा या झोपडपट्टी वसाहतीतील झोडपट्टीमध्ये राहणाऱ्यांना म्हाडाच्या अधिकाऱ्यांनी निष्कासित केल्याबद्दल तक्रारदाराने तक्रार केली आहे.

**आयोगाने केलेली कृती :**

तक्रारीचे परिशीलन केल्यानंतर आयोगाच्या अन्वेषण विभागाकडून चौकशी अहवाल मागवला.

**आयोगाचा निर्णय :**

याबाबतीत सर्व कागदपत्रे व बाबी लक्षात घेतल्यावर आयोगाने असा निष्कर्ष काढला आहे की, झोपडपट्टीवासियांना निष्कासित करून मुंबई महानगर पालिकेने त्यांच्या मानवी हक्कांचे उल्लंघन केले आहे. त्यामुळे आयोगाने पुढील शिफारसी केल्या आहेत.

(अ) महाराष्ट्राचे मुख्य सचिव यांनी अतिरिक्त सचिव, नागरी गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना आदेश द्यावा की, त्याना म्हाडा यांच्या उपाध्यक्षांनी केलेल्या विनंतीवर प्राधान्यक्रमाने विचार करून जास्तीत जास्त एक महिन्यामध्ये दि.११.०३.२०२० च्या पत्राद्वारे केलेल्या विनंतीला आवश्यक ती मान्यता द्यावी.

(ब) महाराष्ट्राचे मुख्य सचिव यांनी अतिरिक्त सचिव, नागरी गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना आदेश द्यावा की, त्यांनी संबंधित धारिकेवर प्रक्रिया करण्यासाठी विलंब का झाला याच्या कारणांची चौकशी करावी व चूक करणाऱ्या अधिकाऱ्यांवर विभागीय कारवाई सुरु करावी. कारण वरकरणी असे दिसून येते की, सदर बाब संवेदनशीलरीत्या व योग्य तऱ्हेने हाताळण्यामध्ये संबंधित विभागाने कुचराई केली आहे.

(क) महाराष्ट्राचे मुख्य सचिव यांनी अतिरिक्त सचिव, नागरी गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना आदेश द्यावा की, त्यांनी निष्कासित केलेल्या झोपडपट्टीवासियांसाठी प्रश्नाधिन प्रकल्प पूर्ण होईपर्यंत संक्रमण शिबीर तयार करण्यासाठी त्वरीत पाऊले उचलावीत. अर्थातच त्यामध्ये उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.३०५/१९९५ मध्ये दिलेल्या आदेशानुसार पैशांचे प्रदान करण्याची तरतूद करण्याचा समावेश आहे.

(ड) महाराष्ट्राचे मुख्य सचिव यांच्या कार्यालयात उपरोक्त आदेशांच्या अनुपालनाचा अहवाल मानवी हक्क संरक्षण अधिनियम, १९९३ च्या कलम १८(इ) नुसार व महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग (कार्यपद्धती) नियमन, २०११, कलम २१ ते २४ यानुसार सादर करावा.

| | |
|---|---|
| २. खटला क्रमांक : | ४५२/२०१८ |
| तक्रारदाराचे नाव : | प्रदीप ए. काळे |
| प्रतिवादीचे नाव : | पोलीस आयुक्त, नवी मुंबई ४०० ७०८<br>अतिरिक्त पोलीस महासंचालक, राज्य गुन्हा अन्वेषण विभाग, मुंबई |
| आदेशाचा दिनांक : | २६ फेब्रुवारी, २०२१ |
| गणपूर्ती (कोरम) : | एम.ए.सईद, प्रभारी अध्यक्ष / सदस्य |

**तक्रारीचे स्वरुप :**

वर्ष २००८ मध्ये घडलेल्या गुन्ह्याच्या अन्वेषणामध्ये पोलिसांनी दयनीय, आळशी, सुस्त व यथातथा पद्धतीनेच गुन्ह्याचे अन्वेषण केल्याबाबत तक्रार आहे. सदर गुन्ह्यामध्ये तक्रारदाराचे वडील कार्यालयात शिरत असताना दोन अनोळखी गुन्हेगारांनी क्रूररीत्या त्यांना गोळ्या घालून मारले.

**आयोगाने केलेली कृती :**

तक्रारीचे परिशीलन केल्यानंतर आयोगाने आयोगाच्या अन्वेषण विभागाकडून चौकशी अहवाल मागवला आहे.

**आयोगाचा निर्णय :**

खटल्याचे पूर्ण कागदपत्र व इतर बाबी पाहिल्यावर आयोगाने असा विरोध न करता येण्यासारखा निष्कर्ष काढला की गुन्ह्याचे अन्वेषण करण्यात खूप दिरंगाई झाली व संशयिताविरुद्ध त्याचा गुन्ह्यात सहभाग सिद्ध करणारा महत्वाचा पुरावा प्राप्त होऊनही उचित कृती योग्य वेळी न केल्यामुळे तक्रारदार व बळी गेलेली व्यक्ती यांच्या मानवी हक्कांचा भंग झाला आहे. त्यामुळे आयोगाने खालील शिफारसी केल्या आहेत.

(अ) पोलीस महासंचालक, मुंबई यांनी पटणा उच्च न्यायालयाने एम.सिंग आणि इतर एआयआर १९८६ पटना ३२४ या खटल्यामध्ये दिलेल्या निकालाच्या प्रती विशेषतः परिच्छेद क्र.५३, ज्यामध्ये गुन्ह्याचे अन्वेषण करणाऱ्या संस्थांवर गुन्ह्यांचे अन्वेषण फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ मध्ये दिलेल्या व समाविष्ट नियमांच्या व नियमनांच्या चौकटीमध्ये वाजवी व योग्य वेळेमध्ये पूर्ण करावे असे आदेश आहेत, त्याच्या प्रती अभिसरीत कराव्यात.

(ब) अतिरिक्त मुख्य सचिव (गृह), मंत्रालय, मुंबई यांच्या कार्यालयाने तक्रारदाराला आदेश प्राप्त झाल्यावर ६ आठवड्याच्या आत नुकसान भरपाई म्हणून रु.१,००,०००/- (रुपये एक लाख) इतकी रक्कम तक्रारदाराला द्यावी. अन्यथा ती रक्कम देईपर्यंत त्यावर १२% व्याज द्यावे लागेल. .

(क) चूक करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याचा पर्यवेक्षकीय अधिकाऱ्यांनी चूक करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध सेवा नियमांतर्गत कारवाई करण्याचा विचार करावा, ज्यायोगे असा संदेश खालच्या स्तरावर जाईल की खुनासारख्या गंभीर गुन्ह्याच्या अन्वेषणामध्ये अशी ढिलाईची, सुस्तपणाची व यथातथा मनोवृत्तीकडे दुर्लक्ष केले जाणार नाही किंवा तिला, क्षमा केली जाणार नाही कारण तसे केले तर सर्व पोलीस दलाची प्रतिमा मलीन होते.

| | |
|---|---|
| ३. खटला क्रमांक : | ३३३/१३/१६/२०२० |
| तक्रारदाराचे नाव : | सुजीत शुक्ला |
| प्रतिवादीचे नाव : | मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा, मुंबई |
| आदेशाचा दिनांक : | १९ मार्च, २०२१ |
| गणपूर्ती (कोरम) : | एम.ए.सईद, प्रभारी अध्यक्ष / सदस्य |

**तक्रारीचे स्वरुप :**

तक्रारदार असे म्हणतो की, तो झोपडी क्रमांक ७२१/सी चा मालक आहे. त्यांने गाऱ्हाणे सादर केले आहे की, बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या अधिकाऱ्यांचा एक चमू त्याच्या झोपडीच्या ठिकाणी आला व त्यांनी ती झोपडी पाडायला सुरुवात केली. त्यांनी विरोधाची दखल घेण्याचे ही नाकारले. तक्रारदाराच्या बायकोने झोपडी पाडून नका अशी विनंती करुनही तिला जुमानले नाही. तिच्या घरातील वस्तूही फेकून दिल्या व त्यांना बेघर केले.

**आयोगाने केलेली कृती :**

आयोगाने तक्रारीचे परिशीलन केल्यानंतर प्रतिवादी प्राधिकरणाकडून चौकशी अहवाल मागवला आहे.

**आयोगाचा निर्णय :**

खटल्याचे पूर्ण कागदपत्र व इतर बाबी पाहिल्यावर आयोगाने असा विरोध न करता येण्यासारखा निष्कर्ष काढला की गुन्ह्याचे अन्वेषण करण्यात खूप दिरंगाई झाली व संशयिताविरुद्ध त्याचा गुन्ह्यात सहभाग सिद्ध करणारा महत्वाचा पुरावा प्राप्त होऊनही उचित कृती योग्य वेळी न केल्यामुळे तक्रारदार व बळी गेलेली व्यक्ती यांच्या मानवी हक्कांचा भंग झाला आहे. त्यामुळे आयोग खालील शिफारसी करीत आहे.

(अ) प्रतिवादी प्राधिकरणाने तक्रारदाराला निवारा नाकारुन त्याच्या मानवी हक्कांचा भंग केला. त्यामुळे त्याला नुकसान भरपाई म्हणून रु.१,००,०००/- द्यावेत.

ब) सदर झोपडी पाडण्याची चूक करण्यासाठी जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याचा प्रतिवादी प्राधिकरणाने विचार करावा कारण अशी मनमानी व बेकायदेशीर कृती करून कायदा व त्याची योग्य प्रक्रिया यांना काहीच किंमत दिली गेली नाही.

(क) प्रतिवादी प्राधिकरणाने घराचा हक्क असणे याबाबतचा कायदा व घर पाडण्याचे ठरवताना पाळायचे नियम व नियमन याबाबत प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना संवेदनशील बनवण्यासाठी कार्यक्रम हाती घ्यावा.

| | |
|---|---|
| ४. खटला क्रमांक : | ९३५/१३/३०/२०२० |
| तक्रारदाराचे नाव : | नथुराम गोविंद उघडे |
| प्रतिवादीचे नाव : | पोलीस अधिक्षक, ठाणे |
| आदेशाचा दिनांक : | ७ सप्टेंबर, २०२० |
| गणपूर्ती (कोरम) : | एम.ए.सईद, प्रभारी अध्यक्ष / सदस्य |

**तक्रारीचे स्वरुप :**

म्हाडस गावी तालुका मुरबाड येथील कायदा व सुव्यवस्थेची स्थिती तेथील असामाजिक कृत्ये धोकादायक प्रमाणात वाढल्यामुळे तेथील ग्रामस्थांच्या जीवनाला व सुरक्षेला धोका निर्माण झाला आहे.

**आयोगाने केलेली कृती :**

आयोगाने तक्रारीचे परिशीलन केल्यानंतर प्रतिवादी प्राधिकरणाकडून चौकशी अहवाल मागवला आहे.

**आयोगाचा निर्णय :**

सर्व कागदपत्रे व इतर बाबींचे परीशीलन केल्यानंतर आयोगाने असा आदेश दिला आहे की, याबाबतीत निर्णय घेण्यासाठी सर्वोत्तम मंच म्हणजे संबंधित विभागाचे वरीष्ठ पोलीस अधिकारी हा होय. कारण या बाबतीत जागरूक निर्णय घेण्याआधी पद्धतींचे विशेष स्वरूप व बारकावे यावर सदर पोलीस अधिकारी यांना गृह विभागाबरोबर सल्लामसलत करून अनेक प्रकारे विचार करावा लागतो. पोलीस अधिक्षक, ठाणे यांनी गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या बरोबर सल्लामसलत करून कायदा व सुव्यवस्था व सार्वजनिक शांतता स्थापित करण्यासाठी व म्हाडस गावातील शांतता ठेवण्यासाठी तेथे पोलीस चौकी स्थापन करावी की गस्त वाढवावी याबद्दल निर्णय घ्यावा.

| | |
|---|---|
| ५. खटला क्रमांक : | १८०/१३/२८/२०१९ |
| तक्रारदाराचे नाव : | आरती व्ही. जकातदार |
| प्रतिवादीचे नाव : | पर्यवेक्षक, रेणुका माता शासकीय महिला वसतीगृह, सोलापूर<br>सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई |
| आदेशाचा दिनांक : | १६ फेब्रुवारी, २०२१ |
| गणपूर्ती (कोरम) : | एम.ए.सईद, प्रभारीअध्यक्ष / सदस्य |

**तक्रारीचे स्वरुप :**

सदर तक्रार ही वसतीगृहामध्ये चालणाऱ्या भ्रष्टाचार व गैरव्यवहार याबाबत आहे, असे निवेदन केले आहे.

**आयोगाने केलेली कृती :**

आयोगाने तक्रारीचे परिशीलन केल्यानंतर प्रतिवादी प्राधिकरणाकडून चौकशी अहवाल मागवला आहे.

**आयोगाचा निर्णय :**

सर्व कागदपत्रे व इतर बाबी यांचा विचार केल्यावर आयोगाने असा आदेश दिला की, महिला व बाल विकास विभाग आयुक्त, पुणे विभाग यांनी सदर मामला सोडवण्यासाठी / त्रुटी दूर करण्यासाठी त्वरीत दुरुस्त्या करणारी पाऊले उचलावीत. म्हणजेच वसतीगृहातील सहवासींना शिक्षण द्यावे व अन्य सुविधा घ्याव्यात. तसेच वसतीगृहातील सहवासींना शासनाने त्यांच्याबाबत केलेल्या तरतुदींबाबत त्यांना संवेदनशील करावे.

| | |
|---|---|
| ६. खटला क्रमांक : | १३२८/१३/१६/२०२० |
| तक्रारदाराचे नाव : | डॉ. किरीट सोमय्या आणि इतर |
| प्रतिवादीचे नाव : | आयुक्त महानगर पालिका, बृहन्मुंबई महानगर पालिका, मुंबई<br>सचिव, सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई<br>सचिव, महिला व बालविकास विभाग, मुंबई |
| आदेशाचा दिनांक : | ९ सप्टेंबर, २०२० |
| गणपूर्ती (कोरम) : | एम.ए.सईद, प्रभारीअध्यक्ष / सदस्य |

**तक्रारीचे स्वरूप :**

तक्रारदार हे संसदेचे माजी सदस्य आहेत व समाज कार्यकर्ते आहेत. चिल्ड्रन एड सोसायटी यांनी चालवलेल्या मानखुर्द येथील बालसुधार केंद्राला त्यांनी भेट दिली. त्यावेळी त्यामध्ये १३० मुले रहात होती. जुलैच्या पहिल्या आठवड्यात तेथील एक सुरक्षा रक्षकाला कोविडची बाधा झाली. तो कोविडचा तिथला पहिला बळी होता. फक्त दोन आठवड्यातच त्याचा मृत्यू झाला. त्यानंतर खुद्द तेथील मुलांनाच (जवळजवळ ३०) कोविडची बाधा झाली. बालसुधार गृहाला भेट देताना तक्रारदाराला तेथील कर्मचाऱ्यांच्या स्थितीची कल्पना आली. तेथील कर्मचाऱ्यांना महिना महिना पगार मिळाला नाही त्यामुळे त्यांच्या रोजीरोटीचे साधन हिरावून घेतले गेले आहे व त्यांचे मनोधैर्य खचले आहे.

**आयोगाने केलेली कृती :**

आयोगाने तक्रारीचे परिशीलन केल्यानंतर प्रतिवादी प्राधिकरणाकडून चौकशी अहवाल मागवला आहे.

**आयोगाचा निर्णय :**

खटल्याचे पूर्ण कागदपत्र व इतर बाबी पाहिल्यावर आयोगाने असा विरोध न करता येण्यासारखा निष्कर्ष काढला की गुन्ह्याचे अन्वेषण करण्यात खूप दिरंगाई झाली व संशयिताविरुद्ध त्याचा गुन्ह्यात सहभाग सिद्ध करणारा महत्त्वाचा पुरावा प्राप्त होऊनही उचित कृती योग्य वेळी न केल्यामुळे तक्रारदार व बळी गेलेली व्यक्ती यांच्या मानवी हक्कांचा भंग झाला आहे. त्यामुळे आयोग खालील शिफारसी करीत आहे.

(अ) महाराष्ट्राचे मुख्य सचिव यांनी माननीय मंत्री, महिला व बालविकास विभाग व सामाजिक न्याय यांच्या अध्यक्षतेखाली तज्ञांची एक समिती नेमावी. या तज्ञ समितीमध्ये सामाजिक क्षेत्रात विशेष काम केलेल्या अत्यंत नामांकित व्यक्तींचा समावेश

असावा. या तज्ञ समितीने महाराष्ट्र राज्यात असलेल्या मानसिक परिणाम झालेल्या व अपंग मुलांसाठी असलेल्या बालसुधार गृहाची देखरेख व व्यवस्थापन यावर देखरेख करावी की ज्यायोगे भारत सरकारने कोविड-१९ च्या परिस्थितीच्या व्यवस्थापनासंबंधी आणि नियंत्रणासंबंधी महाराष्ट्र सरकारने घालून दिलेल्या नियमांचे व मार्गदर्शक तत्वांचे योग्य व उचित पालन होत आहे व मुलांच्या सुरक्षिततेवर कडक लक्ष ठेवले जात आहे याची खात्री करून घ्यावी.

(ब) प्रधान सचिव, महिला व बाल कल्याण विभाग, मंत्रालय यांनी वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याशी समन्वय साधून मानखुर्द येथील बालसुधार केंद्रातील कर्मचाऱ्यांच्या पगाराची थकबाकी वेळेवर प्रदान केली जाईल याची खात्री करून घ्यावी. तसेच भविष्यामध्ये या कर्मचाऱ्यांचे वेतन शासनाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार नियम व नियमनांनुसार प्रदान केले जात आहे याची खात्री करून घ्यावी.

| | |
|---|---|
| ७. खटला क्रमांक : | ८३१/१३/१६/२०२० |
| तक्रारदाराचे नाव : | मोहम्मद अर्शद खान |
| प्रतिवादीचे नाव : | पोलीस उपायुक्त – युनिट १, डीसीबी, गुन्हा अन्वेषण विभाग, अंधेरी (पूर्व), मुंबई |
| आदेशाचा दिनांक : | १९ नोव्हेंबर, २०२० |
| गणपूर्ती (कोरम) : | एम.ए.सईद, प्रभारी अध्यक्ष / सदस्य |

**तक्रारीचे स्वरूप :**

तक्रारदार असे म्हणतात की, दि.१०.०६.२०२० रोजी दुपारी २ ते ३ च्या दरम्यान साध्या पोषाखातील ४/५ पोलीस कर्मचारी तक्रारदाराच्या तयार कपड्याच्या दुकानात घुसले व तक्रारदाराला त्यांनी त्यांच्या युनिट-६, चेंबूर येथील त्यांच्या ऑफिसमध्ये यायला सांगितले. असा आरोप आहे की, त्या ऑफिसमध्ये पोचल्यावर तक्रारदाराला एका खोलीत नेले. तेथे वरिष्ठ पोलीस निरीक्षक व अन्य अधिकारी होते त्यात एक महिला अधिकारी सुद्धा होत्या. सुरुवातीला प्रश्न विचारल्यानंतर त्यांनी तक्रारदाराला शिवीगाळ केली, त्याला अपमानास्पद वागवले व त्याच्यावर लाकडी काठीने हल्ला केला व त्यांना हातावर, खांद्यावर व इतर अवयवांवर मारले. तसेच त्याला दोन पोलीस अधिकाऱ्यांनी पट्ट्याने मारले व खंडणी उकळण्याच्या खोट्या गुन्ह्यात अडकवले, असा आरोप केला गेला आहे की त्याने रु.१०.०० लाख इतकी रक्कम द्यावी, अन्यथा त्याला खंडणी उकळण्याच्या खोट्या गुन्ह्यात अडकवण्यात येईल.

**आयोगाने केलेली कृती :**

आयोगाने तक्रारीचे परिशीलन केल्यानंतर प्रतिवादी प्राधिकरणाकडून चौकशी अहवाल मागवला आहे.

**आयोगाचा निर्णय :**

सर्व कागदपत्रे व इतर बाबी लक्षात घेता आयोगाला असे वाटते की, तक्रारदाराचा वैशिष्ट्यपूर्ण स्वभाव व या मामल्याची पार्श्वभूमी व तक्रारदाराने केलेली सदर तक्रार फेटाळून लावावी व खालील आदेश पारित करावेत.

तक्रारदार अर्शद खान यांनी पोलीस उपायुक्त – युनिट १, डीसीबी, गुन्हा अन्वेषण विभाग, अंधेरी (पूर्व), मुंबई यांच्या अधिकाऱ्यांविरुद्ध आधार नसलेली खोटी तक्रार दाखल केली व कायद्याचा दुरुपयोग केला. त्यामुळे तक्रारदारांनी पोलीस उपायुक्त – युनिट १, डीसीबी, गुन्हा अन्वेषण विभाग, अंधेरी (पूर्व), मुंबई यांच्या कार्यालयाला रु.२५,०००/- इतकी नुकसान भरपाई द्यावी.

| | |
|---|---|
| ८. खटला क्रमांक : | ३५८०/२०१८ |
| तक्रारदाराचे नाव : | डॉ. कार्तिकेय मिश्रा |
| प्रतिवादीचे नाव : | प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई<br>प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग |
| आदेशाचा दिनांक : | ७ जानेवारी, २०२१ |
| गणपूर्ती (कोरम) : | एम.ए.सईद, प्रभारीअध्यक्ष / सदस्य |

**तक्रारीचे स्वरुप :**

शासनाचा एक प्रकल्प "मद्याचे व्यसन व नशा आणणारे पदार्थ (ड्रग्ज) यांचे व्यसन थांबवणे व सामाजिक सुरक्षा सेवा यासाठी सहाय्य योजना" या अंतर्गत नोंदणीकृत असलेले "सद्भाव नशा मुक्ती केंद्र" चालवले जाते. या मुक्ती केंद्रामधील सहवासीना अपमानास्पद व मानहानीकारक (degrading) वागणूक दिली जाते व या केंद्राचे व्यवस्थापन अत्यंत दयनीय आहे अशी तक्रार तक्रारदाराने केली आहे.

**आयोगाने केलेली कृती :**

आयोगाने तक्रारीचे परिशीलन केल्यानंतर प्रतिवादी प्राधिकरणाकडून चौकशी अहवाल मागवला आहे.

**आयोगाचा निर्णय :**

सर्व कागदपत्रे व इतर बाबींचा विचार करून आयोगाने खालील आदेश दिला.

जळगावच्या जिल्हाधिकाऱ्यांना असा आदेश दिला जातो की, त्यांनी तज्ञांची एक समिती नेमून याबाबतीत लक्ष घालावे. सदर समितीमध्ये हितसंबंधित विभाग तसेच कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणा यांचे प्रतिनिधी असावेत व त्यांच्याकडे या बाबीची चौकशी सोपवावी. या चौकशीच्या निष्कर्षावर अवलंबून जळगावच्या जिल्हाधिकाऱ्यांनी पुढील कृती ठरवावी.

| | |
|---|---|
| ९. खटला क्रमांक : | ७७७/१३/१६/२०२० |
| तक्रारदाराचे नाव : | हरकृष्णा वेंबू |
| प्रतिवादीचे नाव : | प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई |
| आदेशाचा दिनांक : | १४ जानेवारी, २०२१ |
| गणपूर्ती (कोरम) : | एम.ए.सईद, प्रभारी अध्यक्ष / सदस्य |

**तक्रारीचे स्वरुप :**

तक्रारदाराचे असे म्हणणे आहे की, त्याला अराईज अँड शाईन प्रतिष्ठानच्या व्यसन मुक्ती केंद्रात दाखल केले होते. त्याचा असा आरोप आहे की, त्याला तेथे अत्यंत वाईट अनुभव आला. त्या केंद्रात फार गर्दी होती. तेथे योग्य सुविधांचा अभाव होता. तेथे रुग्णांवर उपचार करणाऱ्या डॉक्टरांनी रुग्णांना छळणे व अपमानित करणे असे खूप प्रकार होत होते व तेथील कर्मचाऱ्यांच्या स्थितीचा गैरफायदा घेतला जात होता व त्यांना अत्यंत रोगट वातावरणात रहाणे भाग पाडत होते.

**आयोगाने केलेली कृती :**

आयोगाने तक्रारीचे परिशीलन केल्यानंतर प्रतिवादी प्राधिकरणाकडून चौकशी अहवाल मागवला आहे.

**आयोगाचा निर्णय :**

अभिलेखावरील सर्व कागदपत्रे व इतर बाबींचा विचार करून आयोग पुढील आदेश देत आहे.

आरोग्य संचालक, मुंबई यांनी प्राधान्यक्रमाने सदर नशामुक्ती केंद्रावर फौजदारी गुन्हा दाखल करावा व हे नशामुक्ती केंद्र बंद करावे कारण त्यांच्या स्वतःच्या शोधकार्यावरुन सदर केंद्र बेकायदेशीररीत्या चालवले जात आहे.

| | |
|---|---|
| १०. खटला क्रमांक : | स्वतःहून चालवलेला खटला क्र.५/१३/१६/२०२० |
| प्रतिवादीचे नाव : | पोलीस आयुक्त, मुंबई |
| आदेशाचा दिनांक : | २५ फेब्रुवारी, २०२१ |
| गणपूर्ती (कोरम) : | एम.ए.सईद, प्रभारीअध्यक्ष / सदस्य |

**तक्रारीचे स्वरुप :**

एका भयसूचक बातमीच्या आधारे आयोगाने एका बाबतीत स्वतःहून कृती केली की ज्यामध्ये एक कार्यकर्ते श्री. शिंदे यांचा शारिरीक व मानसिक छळ अन्य कोणी नव्हे तर उपआयुक्त, पोलीस या पदावरील एका वरिष्ठ जबाबदार पोलीस अधिकाऱ्याने केला.

**आयोगाने केलेली कृती :**

आयोगाने तक्रारीचे परिशीलन केल्यानंतर प्रतिवादी प्राधिकरणाकडून चौकशी अहवाल मागवला आहे.

**आयोगाचा निर्णय :**

सर्व बाबींचा विचार करून आयोगाने असे आदेश दिले आहेत की, छापील माध्यमांनी या मार्गदर्शक तत्वांबद्दल जागरुक केले पाहिजे की ज्यायोगे ती अशा आधारहीन घटनांना प्रसिद्धी देणार नाहीत की ज्यामुळे फक्त एखाद्या सार्वजनिक प्राधिकरणाची प्रतिमा मलिन होते. बोलणे आणि अभिव्यक्ती यांचे स्वातंत्र्य हे इतक्या प्रमाणात ताणू नये की, एखादी बातमी केवळ माध्यमांचे लक्ष वेधून घेण्यासाठी शहानिशा न करता छापली जाईल. अशा पद्धती समाजाला त्रासदायक होण्याआधीच त्यांना ताबडतोब आळा घातला पाहिजे व त्या मुळातच बंद केल्या पाहिजेत.

## विभाग ६ — आयोगाचे शिफारशी बाबत सरकारचे अनुपालन किंवा नकार

| आदेश दिनांक | शिफारसी | प्राप्त झालेला अनुपालन अहवाल / पत्रे |
|---|---|---|
| ०५.०४.२०१७ | अतिरिक्त मुख्य सचिव, गृह विभाग यांनी तक्रारदाराला रु.१,००,००० इतकी नुकसान भरपाई द्यावी. | गृह विभागाकडून तक्रारदाराला सदर नुकसान भरपाईची रक्कम देण्याबाबतचा दिनांक १४.१०.२०२० चा शासन निर्णय प्राप्त झाला. |
| २९.०८.२०१८ | अतिरिक्त मुख्य सचिव, गृह विभाग यांनी तक्रारदाराला रु.१,००,०००इतकी नुकसान भरपाई द्यावी. | गृह विभागाकडून तक्रारदाराला सदर नुकसान भरपाईची रक्कम देण्याबाबतचा दिनांक १९.०१.२०२१ चा शासन निर्णय प्राप्त झाला. |
| ०२.०५.२०१७ | अतिरिक्त मुख्य सचिव, गृह यांनी मृत व्यक्ती कल्पना यांच्या मुलाला नुकसान भरपाई रु.५,००,००० (रुपये पाच लाख) द्यावी. | दि.०६.०१.२०२१ चे पत्र व नुकसान भरपाईची रक्कम रु.५,००,००० मृत व्यकतीच्या मुलाला दिल्याची पावती प्राप्त झाली. |
| ०५.०५.२०१७ | अतिरिक्त मुख्य सचिव, गृह यांनी मृत व्यक्ती पवार यांच्या कायदेशीर वारसांना नुकसान भरपाई रु.२,००,००० (रुपये दोन लाख) द्यावी. | १. जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडून दिनांक ०४.०५.२०२० चे पत्र प्राप्त झाले. त्यामध्ये असे म्हंटले आहे की, उप तुरुंगाधिकारी यांच्याकडून कर्तव्यात कोणतीही कसूर झालेली नाही, त्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्याची आवश्यकता नाही.<br>२. गृह विभागाकडून नुकसान भरपाईची रक्कम रु.२,००,००० ऐवजी रु.२५,०००/- मंजूर केल्याचा दिनांक ०२.०२.२०१९ चा शासन निर्णय प्राप्त झाला.<br>३. गृह विभागाकडून दिनांक ०८.०१.२०२० चे पत्र व त्याबरोबर मृत व्यक्तीच्या कायदेशीर वारसांना नुकसान भरपाई प्रदान केल्याची पावती प्राप्त झाली. |
| ०८.०८.२०१७ | शासनाने तक्रारदाराला रु.५०,००० नुकसान भरपाई द्यावी. | गृह विभागाकडून तक्रारदाराला रु.५०,००० नुकसान भरपाई देण्याचा दिनांक ०५.१०.२०२० चा शासन निर्णय प्राप्त झाला. |